औरंगाबाद गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाची बुधवार दि. 25-4-90 रोजी दुपारी ३.०० वा. झालेल्या ४९ व्या सभेचा कार्यवृत्तांत.

सभेस खालील पदाधिकारी उपस्थित होते.

| | |
|---|---|
| श्री. ईश्वर भोसीकर | सभापती/औ.मं |
| श्री. अ. म. गोखले | प्रभारी उपसभापती/औ.मं |
| श्री. द. मो. गोडघाटे<br>उपसंचालक नगररचना औरंगाबाद | सदस्य |
| श्री. जंबगी<br>कार्यकारी अभियंता,<br>म. न. पा. औरंगाबाद. | आयुक्त, म. न. पा. औरंगाबाद<br>यांचे सदस्य प्रतिनिधि<br>[illegible] |

खालील सदस्य पूर्वसुचनेने अनुपस्थित होते.

आयुक्त, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद

आयुक्त, नासिक विभाग, नासिक.

प्रशासक, महानगरपालिका नासिक.

विषय क्र. १: दिनांक ३१.३.९० रोजी झालेल्या ४८ व्या सभेचा कार्यवृत्तांत कायम करणे.

दिनांक ३१.३.९० च्या ४८ व्या सभेतील विषय क्र. ६ व ठराव क्र. २५९ वर चर्चा करतांना श्री. द. मो. गोडघाटे उपसंचालक नगररचना यांनी विचारणा केली की, या विषयावर आतापर्यन्त काय कार्यवाही झाली व अनधिकृत बांधकाम करणारांना द्यावयाच्या नोटीसीचा प्रारुप मसुदा मंडळासमोर ठेवला नाही याबद्दल नाराजी व्यक्त केली. श्री. गोडघाटे उपसंचालक नगररचना यांनी अशी प्रतिक्रिया व्यक्त केली की, मंडळाने ठरावाद्वारे निर्णय होऊनही त्याची अंमलबजावणी अधिका-याकडून होत नाही. ही बाब गंभीर असून यासंबंधी मा. सभापतींचे लक्ष वेधले. वाळूज विशेष नियोजन प्राधिकरण कार्यालयात काम करीत असलेले नगररचनाकार यांना मंडळासमोर बोलावून कामाविषयी चौकशी करुन अनाधिकृत कामे करणा-या व्यक्तींची माहिती गोळा करुन त्यांच्यावर १० मे १९९० पर्यन्त नोटीसी तामील कराव्यात अशी समज दिली. यासंबंधी उपसभापती यांनी मंडळाच्या असे निदर्शनास आणून दिले की, श्री. नंदीमठ सहाय्यक संचालक नगररचना वाळूज यांची बदली झाल्यापासून सदर पद रिक्त आहे. व या पदाचा अतिरिक्त कार्यभार सहाय्यक संचालक नगररचना/प्राधिकरण मुंबई यांच्याकडे असल्यामुळे वाळूज विशेष नियोजन प्राधिकरणाच्या कामाकडे

विशेष लक्ष पुरवू शकत नाही. त्यामुळे या काम स योग्य ती गती आढळून येत नाही. यावर श्री. द. मो. गोडघाटे उपसंचालक नगररचना औरंगाबाद यांनी मुद्दा मांडला की, आजच्या वाढत्या औद्योगिक क्षेत्रामुळे वाळूज विभागात निवा-याची समस्या दिवसेंदिवस जास्त भेडसावत असल्याने विशेष नियोजन प्राधिकरणाचे काम जलद गतीने होणे आवश्यक असल्याने सहाय्यक संचालक नगररचना वाळूज हे पद त्वरीत भरण्यास प्राधिकरणास विनंती करावी.

ठराव क्र. २६२

श्री. द. मो. गोडघाटे उपसंचालक नगररचना औरंगाबाद विभाग यांनी मांडलेल्या मुद्यावर सविस्तर चर्चा होऊन मंडळाने असा निर्णय घेतला की, प्राधिकरणास मंडळातर्फे विनंती करुन सहाय्यक संचालक नगररचना/वाळूज हे रिक्त असलेले पद त्वरीत भरण्याविषयी प्राधिकरणाकडे प्रस्ताव पाठवावा.

. . .

मंडळाच्या दिनांक ३१. ३. ९० रोजी झालेल्या ४८ व्या सभेच्या कार्यवृत्तांतावर मंडळाने सविस्तर चर्चा करुन खालील प्रमाणे निर्णय घेतला.

ठराव क्र. २६३

दिनांक ३१. ३. ९० रोजी झालेल्या ४८ व्या सभेच्या कार्यवृत्तांतावर सविस्तर चर्चा होऊन कायम करण्यांत आला.

विषय क्र. २: सर्व्हे क्र. २७२ [भाग] जालना-मंठा मार्गावरील अल्प उत्पन्न गट-२, १८० गाळयांचे बांधकाम करण्यासाठी मागविलेल्या निविदावर निर्णय घेणेबाबत.

. . . .

ठराव क्र. २६४

सर्व्हे क्र. २७२ [भाग] जालना मार्गावरील अल्प उत्पन्न [गट-२] गटातील १८० गाळयांच्या बांधकामाकरिता प्राप्त झालेल्या निविदेवर निविदा समितीने केलेल्या शिफारशीनुसार अंदाजपत्रकीय दरापेक्षा २०% जास्त दराची निविदा स्विकारण्यास मंडळाने सर्वानुमते मंजूरी दिली.

[७]

विषय क्र. ३:- औरंगाबाद मंडळाने बांधलेल्या गाळयांच्या ~~किंमतीमध्ये~~ किंमतीमधील वाढीला मंजूरी देणे.

स. नं. ११७ [भाग] भोकरदन रोड, जालना येथील अल्प उत्पन्न गटातील २७२ गाळयाची योजना.

......

या विषयावर सविस्तर चर्चा करतांना उपसभापतींनी सांगितले की, स. न. ११७[भाग] भोकरदनरोड जालना येथील अल्प उ. गटातील २७२ गाळयांच्या योजनेस प्रशासक/प्राधिकरण यांनी त्यांचे पत्र क्र. एमएच/एससीएच/औ. मं/१७२-८७/२८५७ मु. अ/दि. २९. ७. ८७ अन्वये प्रशासकीय मान्यता दिली व तांत्रिक मान्यता मुख्याधिकारी औ. मं. यांनी त्यांचे पत्र क्र. ५९९९ दिनांक १६. ९. ८७ अन्वये दिलेली आहे. योजनेच्या निविदा प्राधिकरणाने स्वीकृत केल्या व वर्कऑर्डर देऊन कामास दिनांक १२. ११. ८७ रोजी सुरुवात झाली. मागणी अंदाज अजमाविण्यासाठी ९/८७ मध्ये जाहिरात देण्यांत आली. जाहिरातीच्या वेळी प्रत्येक गाळयांची किंमत जोत्याच्या क्षेत्रफळावर आधारीत रु. २७, ५००/- ठेवण्यांत आली होती. सदर योजनेच्या बांधकामास परवानगी मिळावी म्हणून जालना न. प. कडे दिनांक २. १. ८७ रोजी प्रस्ताव पाठविला होता. जालना न. प. ने प्रत्येक गाळयाच्या किंमतीच्या १% सेवाशुल्क भरण्यास त्यांचे पत्र क्र. ७६५ दि. २३. ११. ८७ ने कळविले होते. यासंबंधी प्राधिकरण/अप्पर आयुक्त/जिल्हाधिकारी/.. जालना यांच्याशी पत्रव्यवहार करुन सेवा शुल्क कमी करण्याची विनंती केली. परंतु यास पुरेसा प्रतिसाद न मिळाल्याने अतिरिक्त आयुक्त/औरंगाबाद यांचेकडे सेवा शुल्काच्या संदर्भात पत्र क्र. ७०९ दिनांक ११.१ . ८९ अन्वये अपील केले. या प्रकरणी अप्पर आयुक्त औरंगाबाद यांच्याकडे वेळोवेळी प्रत्यक्ष संपर्क साधून लवकरप्रकरण निकाली निघण्यासाठी मंडळाने प्रयत्न केला. सदर प्रकरणी अप्पर आयुक्त औरंगाबाद यांनी मंडळाच्या बाजूने ३१. ७. ८९ ला निकाल दिला व सदर निर्णयानुसार न. प. जालनाने पत्र क्र. ४३७/८९ दिनांक २८. १२. ८९ अन्वये मंजूरी दिली.

यापुढे उपसभापतींनी सांगितले की, सदर योजनेचे बांधकाम चालु असतांना काही बदल करणे भाग पडले काही जास्ती च्या सुविधा देण्यांत आल्या. तसेच वाहन चालकांचा संप मजूराचा संप, अतिवृष्टी इ. मुळे योजना पूर्ण होण्यास विलंब झाला

आता योजना पूर्ण झालेली आहे व झालेला खर्च, भविष्यात करावयाची कामे इ. करिता तरतुद लक्षात घेऊन गाळ्यांची किंमत रु. २७,५००/- वरुन रु. २९,२००/- ठरविण्यांत आलेली आहे.

ठराव क्र. २६५

मंडळाने चर्चेअंती स.न.११७[भाग] भोकरदनरोड जालना येथील अल्प उत्पन्न गट-२ येथील गाळ्यांची किंमत रु. २७,५००/- वरुन रु. २९,२०० /- या वाढीव किंमतीस मंडळाने मान्यता दिली.

विषय क्र. ४: उपजिविकेसाठी आजूबाजूच्या ग्रामीण भागातून शहराकडे येणा-या स्थलांतरीतांच्या निवा-याचा विचार करुन संभाव्या झोपडपट्टीवाढ थांबविणेबाबत.

ठराव क्र. २६६

सदर प्रस्तावावर चर्चा करतांना मंडळाच्या सदस्यांचे असे मत झाले की, मा. आयुक्त नासिक विभाग हे बैठकीस हजर नसल्यामुळे सदरचा विषय पुढील सभेचे वेळी चर्चेस ठेवण्यांत यावा.

. . . .